# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः12.11.2025** **वारःबुधवार**

---

१. दिल्ली कार स्फोट प्रकरणाचा तपास राष्ट्रीय संस्था करणार
२. स्फोटाचा कट रचणाऱ्यांना सोडणार नाही, पंतप्रधानांचा इशारा
३. केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या राष्ट्रीय जल पुरस्कारांमध्ये महाराष्ट्र अव्वल आणि
४. आयएसएसएफ अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय नेमबाजांचा रौप्यवेध

**<u>अमित-शहा</u>**

केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी सुरक्षा संस्थांबरोबर काल उच्चस्तरीय बैठक घेतली. दिल्ली कार स्फोटातील संबंधित प्रत्येकावर कठोर कारवाई केली जील असा इशारा त्यांनी यावेळी दिला. दिल्ली कारस्फोट घटनेमागील प्रत्येक गुन्हेगाराचा शोध घेण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. पहिल्या बैठकीत केंद्रीय गृह सचिव, गुप्तचर विभागाचे संचालक, दिल्ली पोलिस आयुक्त आणि राष्ट्रीय तपास यंत्रणेचे महासंचालक उपस्थित होते. जम्मू आणि काश्मीरचे पोलिस महासंचालक दुरस्थ पद्धतीने बैठकीत सहभागी झाले. दुसऱ्या बैठकीत केंद्रीय गृह सचिव, गुप्तचर विभागाचे संचालक, राष्ट्रीय तपास यंत्रणेचे महासंचालक, राष्ट्रीय सुरक्षा संस्थेचे अर्थात एनएसजीचे महासंचालक, न्यायवैद्यकीय विज्ञान सेवा संचालक, दिल्लीतील न्यायवैद्यकीय विज्ञान प्रयोगशाळेचे मुख्य संचालक आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

गृह मंत्रालयाने या घटनेचा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे सोपवला आहे.
दरम्यान, दिल्ली-एनसीआर आणि पुलवामा इथं सुरक्षा यंत्रणांनी अनेक ठिकाणी टाकलेल्या छाप्यांमध्ये मोठ्या प्रमाणात स्फोटके जप्त केली आहेत. हरियाणाच्या फरीदाबाद इथं या महिन्याच्या ९ आणि १० तारखेला टाकलेल्या छाप्यांमध्ये एकंदर तीन हजार किलो स्फोटके, डेटोनेटर, टायमर आणि इतर बॉम्ब बनवण्याचे साहित्य जप्त केले. वाढत्या दबावाखाली संशयिताने दिल्लीतील कारमध्ये स्फोट घडवून आणला असावा अशी शक्यता तपाससंस्थेने व्यक्त केली आहे. हल्ल्यामागील सुत्रधार यापेक्षा तीव्र स्वरुपाचा स्फोट घडवून आणण्याच्या तयारीत होते असं संशियितांच्या चौकशीदरम्यान समोर येत आहे. सुरक्षा यंत्रणांच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली असल्याचं सुत्रांनी म्हटलं आहे.

**<u>दिल्ली-सरकार</u>**

दिल्ली राज्य सरकारने गेल्या सोमवारी कार स्फोटातील मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना १० लाख रुपयांची सानुग्रह मदत दिली जाईल. अशी घोषणा केली आहे. कायमचे अपंगत्व आलेल्या व्यक्तींना ५ लाख रुपये आणि गंभीर जखमींना २ लाख रुपये दिले जातील.अशी माहिती दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी समाजमाध्यमावरील संदेशात दिली आहे.
दरम्यान, सुरक्षेच्या कारणास्तव, लाल किल्ला मेट्रो स्टेशनचा प्रवेश आणि निर्गमन मार्ग पुढील आदेशापर्यंत बंद राहील. अशी माहीती दिल्ली मेट्रो रेल प्राधिकरणानं दिली आहे.

**<u>विमानतळ</u>**

दिल्लीतील सध्याच्या परिस्थितीमुळे, दिल्ली विमानतळावरील सुरक्षा यंत्रणा अधिक कडक करण्यात आल्यानं प्रवाशांच्या चौकशीचा वेळ वाढला आहे. प्रवाशांनी त्यांच्या प्रवासाचे नियोजन करण्याचे आणि शेवटच्या क्षणी होणारी गैरसोय टाळण्यासाठी विमानतळावर नियोजित वेळेच्या आधी पोहोचण्याचे आणि सुरक्षा संस्थांना सहकार्य करण्याचं आवाहन दिल्ली विमानतळ प्राधिकरणानं जारी केलेल्या निवेदनांत केलं आहे.

**<u>पंतप्रधान</u>**

दिल्ली कार स्फोटामागील कट रचणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल दिला. भूतानचे माजी राजा जिग्मे सिंग्ये वांगचुक यांच्या ७० व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाला संबोधित करताना थिंपू इथं ते बोलत होते. आपणदिल्लीतील घटनेमुळे जड अंतःकरणाने थिंपूला आलो आहेत. अशी प्रतिक्रियाही त्यांनी व्यक्त केली.

**<u>पंतप्रधान</u>**

भारत - भूतान संबंध भावना, शांती आणि प्रगती या मूल्यांवर आधारित असल्याचं प्रतिपादन पंतप्रधानांनी योवेळी बोलताना केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी भूतान दौऱ्यात आज थिंपू इथं चांगलिमिथांगमध्ये आयोजित कालचक्र सशक्तीकरण समारंभात सहभागी होणार आहेत. काल थिंपूमध्ये मोदी यांनी भूतानचे राजा जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्यासाठी तसंच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही चर्चा केली.

**<u>राष्ट्रपतीबोत्सवाना</u>**

राष्ट्रपति द्रौपदी मुर्मु आज बोत्सवाना च्या राष्ट्रपती ड्यूमा बोको गॅबोरोन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. व्यापार आणि गुंतवणूक , तंत्रज्ञान, ऊर्जा, कृषी, आरोग्य, औषधनिर्माण, संरक्षण यासारख्या क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यासाठी असलेल्या नवीन संधीवर यावेळी चर्चा होणार आहे. यावेळी राष्ट्रपती तिथल्या संसदेला संबोधित करणार असून, भारतीय समुदायाच्या सदस्यांशी संवाद साधणार आहेत. बोत्सवाना मधल्या ऐतिहासिक स्थळांना ही त्या भेट देणार आहेत.

दरम्यान, अंगोला दौरा संपवून बोत्सवाना ला पोहोचलेल्या राष्ट्रपती मुर्मु यांचं २१ तोफाची सलामी देऊन स्वागत करण्यात आलं. भारताच्या राष्ट्रपतींची आफ्रिकेच्या या दोन देशांना दिलेली पहिलीच भेट आहे.

**जल-पुरस्कार**

केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या सहाव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांची काल जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी घोषणा केली. महाराष्ट्रानं सर्वोत्कृष्ट राज्य श्रेणीत प्रथम क्रमांक पटकावला आहे. गुजरात दुसऱ्या तर हरियाणा तिसऱ्या क्रमांकावर आहे. स्थानिक स्वराज्य संस्था गटात नवी मुंबई महापालिकेनं प्रथम पुरस्कार तर पाणी वापर संस्थांमध्ये नाशिक जिल्ह्यातल्या कानिफनाथ संस्थेनं व्दितीय क्रमांक पटकावला आहे.

जलशक्ती मंत्रालयाच्या जलसंसाधन, नदीविकास आणि गंगा संरक्षण विभागातर्फे जलसंरक्षण आणि जलव्यवस्थापनातील उत्कृष्ट कामगिरीला प्रोत्साहन देण्यासाठी हे पुरस्कार देण्यात येतात. पुरस्कार वितरण येत्या 18 नोव्हेंबरलाराष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत होणार असून प्रशस्तिपत्र, चांदीची ढाल, आणि श्रेणीनुसार 1 लाख ते 5 लाख रुपयांपर्यंत रोख पारितोषिक असं पुरस्कारांचं स्वरूप आहे.10 विविध श्रेणींमध्ये संयुक्त विजेत्यांसह एकंदर 46 संस्था आणि व्यक्तींना या वर्षी सन्मानित केलं जाणार आहे.

**मंत्रीमंडळ-निर्णय**

महाराष्ट्रातील नाशिक, नागपूर आणि धाराशिव जिल्हा मध्यवर्ती बँकांना भागभांडवल म्हणून 827 कोटी रुपये देण्यास काल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत विविध निर्णय घेण्यात आले. भारतीय रिझर्व्ह बँकेनं या बँकांचं पुनर्भांडवलीकरण आणि पुनरूज्जीवन करण्याबाबत शासनाला सांगितल्यानुसार हे अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलं आहे.

**अनावरण**

महाराष्ट्राच्या कृषी विभागाच्या नवीन बोधचिन्हाचं तसंच 'शाश्वत शेती – समृद्ध शेतकरी' या नवीन घोषवाक्याचं अनावरण काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं.
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यावेळी उपस्थित होते. बोधचिन्ह आणि घोषवाक्य स्पर्धेतल्या विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.

**जयशंकर**

जी-७ देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची भेट घेण्यासाठी केंद्रिय परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ -एस जयशंकर आज कॅनडातील ओंटारियोला भेट देतील. कॅनडाच्या परराष्ट्र मंत्री अनिता आनंद यांच्या निमंत्रणावरून या बैठकीत सहभागी होण्यासाठी ते कॅनडाला पोहोचले आहेत. अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयानं निवेदनाद्वारे दिली आहे. विविध देशांदरम्यान द्विपक्षीय बैठका, जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील भागीदारांसोबत भविष्यात कशा प्रकारे काम करता येईल याबाबत चर्चा अपेक्षित आहे.

कॅरिबियन बेटांवर अमेरिकेच्या लष्करी कारवायांवर फ्रान्सने चिंता व्यक्त केली आहे आणि ही कारवाई हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन असल्याचं म्हटलं आहे. काल कॅनडामध्ये झालेल्या G7 परराष्ट्र मंत्र्यांच्या शिखर परिषदेत बोलताना फ्रान्सचे परराष्ट्र मंत्री जीन-नोएल बॅरोट यांनी ही माहिती दिली. अमेरिकन सैन्याने नुकतीच कॅरिबियन आणि लॅटिन अमेरिकेच्या पॅसिफिक किनाऱ्यावरील जहाजांवर कारवाई केली, त्यामध्ये किमान 76 लोक ठार झाले आहेत. अमली पदार्थ असल्याच्या संशयावरुन ही कारवाई केल्याचं अमेरिकेनं म्हटलं आहे.

**<u>बिहारनिवडणूक</u>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात काल ६६ पूर्णांक ९१ शतांश टक्के मंतदानाची नोंद झाली. या टप्प्यात १ हजार ३०२ उमेदवारांचं राजकीय भवितव्य मतपेटीत बंद झालं आहे. बिहार विधानसभेसाठी 243 मतदारसंघांमध्ये 6 आणि 11 नोव्हेंबर अशा दोन टप्यांमध्ये मतदान झालं. येत्या १४ तारखेला मतमोजणी होणार आहे.

**<u>लोकसेवाप्रसारणदिवस</u>**

आज लोकसेवा प्रसारण दिवस आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी 1947 मध्ये आजच्या दिवशी आकाशवाणीवरून दिलेल्या ऐतिहासिक भाषणाची आठवण म्हणून हा दिवस साजरा केला जातो. दुसऱ्या दिवशी हिंदुस्तान टाईम्स या वृत्तपत्राने ठळक मथळा देत महात्मा गांधींनी रेडिओला भेट दिल्याची बातमी दिली होती. त्यानंतर, बिर्ला हाऊसमध्ये गांधीजींच्या दैनंदिन प्रार्थना सभा ध्वनीलहरींच्या स्वरुपांत रेकॉर्ड केल्या जाऊ लागल्या आणि या रेकॉर्डिंग्ज आजही प्रसार भारती अभिलेखागारात जतन केल्या आहेत.

**<u>FIDE-विश्वचषक</u>**

गोव्यातील पणजी इथं सुरु असलेल्या FIDE विश्वचषक बुध्दीबळ स्पर्धेत काल चौथ्या फेरीच्या पहिल्या सामन्यातग्रँडमास्टर अर्जुन एरिगाईसी, ग्रँडमास्टर कार्तिक वेंकटरमनआणि ग्रँडमास्टर पी. हरिकृष्ण यांना विभागून गुण मिळाले. आर. प्रज्ञानंदाचा रशियाचा ग्रँडमास्टर डॅनिल दुबोव्हविरुद्धचा सामना बरोबरीत राहिला. ग्रँडमास्टर प्रणव वेंकटेशने उझबेकिस्तानच्या ग्रँडमास्टर नोदिरबेकयाकुबबोएव्ह विरुद्धचा सामना अनिर्णित राखला.

**<u>नेमबाजी</u>**

आयएसएसएफ जागतिक नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत काइरो इथं काल झालेल्या पुरुषांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन प्रकाराच्या अंतिम फेरीत ऐश्वर्य प्रताप सिंग तोमरनं काल रौप्यपदक पटकावत पहिलं वैयक्तिक जागतिक अजिंक्यपद पदक जिंकले. एअर पिस्तूल विश्वविजेता सम्राट राणा आणि गतविजेती ईशा सिंग यांनीही १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक स्पर्धेत रौप्यपदक जिंकलं. या विजयामुळे भारत पदक तालिकेत तीन सुवर्ण, पाच रौप्य आणि तीन कास्यपदकं पटकावत दुसऱ्या स्थानी आहे. चीनचे स्पर्धक १४ पदकांसह अग्रेसर आहेत.

**<u>हवामान</u>**

तमिळनाडू, पुदुच्चेरी आणि कराईकलमध्ये आज मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. मध्य प्रदेशात तीव्र थंडीची लाट असेल. या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत दक्षिण हरियाणा, छत्तीसगड, दिल्ली, चंदीगड आणि पूर्व राजस्थानमध्येही थंडीची लाट येईल असा अंदाज आहे. पुढील २ ते ३ दिवसांत देशाच्या ईशान्य भागात किमान तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसने घट होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.**